# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 16 November 2025

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १६ नोव्हेंबर २०२५ सकाळी ७.१० मि.

****

- आदिवासींची अस्मिता हजारो वर्षांच्या भारतीय जाणीवांचा अविभाज्य भाग असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन–भगवान बिरसा मुंडा यांना जयंतीनिमित्त देशभरात अभिवादन
- नागपूर इथं राज्यस्तरीय आदिवासी सांस्कृतिक महोत्सवाचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्धाटन
- नगरपरिषद तसंच नगरपंचायत निवडणुकीसाठी आजही अर्ज दाखल करता येणार
- गझलनवाझ भीमराव पांचाळे यांना ‘मृदगंध पुरस्कार’ जाहीर
- कोलकाता कसोटीत दक्षिण आफ्रिकेच्या दुसऱ्या डावात सात बाद ९३ धावा

आणि

- छत्रपती संभाजीनगरसह जालना आणि बीड जिल्ह्याला थंडीचा यलो अलर्ट

****

आदिवासींची अस्मिता हजारो वर्षांच्या भारतीय जाणीवांचा अविभाज्य भाग असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. स्वातंत्र्यसैनिक आणि आदिवासी समुदायाचे नेते भगवान बिरसा मुंडा यांच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी देशभरात काल आदिवासी गौरव दिवस साजरा झाला. याच अनुषंगाने गुजरातमधल्या नर्मदा जिल्ह्यातल्या देडियापाडा इथं एका कार्यक्रमात पंतप्रधान बोलत होते. स्वातंत्र्य लढ्यात आदिवासींच्या योगदानाकडे पंतप्रधानांनी लक्ष वेधलं, ते म्हणाले...

**बाईट– पंतप्रधान नरेंद्र मोदी**

मुंबई–अहमदाबाद बुलेट ट्रेनच्या सुरत स्थानकाची काल पंतप्रधानांनी पाहणी केली. अंत्रोली इथं उभारल्या जात असलेल्या या स्थानकाचा दौरा करून पंतप्रधानांनी अधिकाऱ्यांशी चर्चा करत, कामकाजाचा आढावा घेतला.

****

आदिवासी संस्कृती जपण्यासाठी राज्य सरकार अनेक नव्या योजना आखत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नागपुरात दिली. स्वातंत्र्यसेनानी बिरसा मुंडा यांच्या जयंतीच्या औचित्यानं राज्यस्तरीय आदिवासी सांस्कृतिक महोत्सवाच्या उद्धाटन समारंभात मुख्यमंत्री बोलत होते. आदिवासींसाठी राबवत असलेल्या शैक्षणिक योजनांचा आढावा घेताना मुख्यमंत्री म्हणाले..

**बाईट– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवी**

आदिवासींना जल, जमीन आणि जंगलापासून न तोडता त्यांना संरक्षण देण्यासाठी सरकार प्रयत्नशील असून, आदिवासी नायकांना शोधून त्यांचा इतिहास जगासमोर आणण्यासाठीही सरकार प्रयत्न करत असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. केंद्रीय रस्ते, परिवहन आणि राष्ट्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यावेळी उपस्थित होते. त्यांनी सरकार आदिवासींच्या प्रगतीसाठी सरकार करत असलेल्या उपाययोजनांचा आढावा घेतला.

****

X S I O इंडस्ट्री, ब्लॅकस्टोन आणि राज्याचा उद्योग विभाग यांच्यात काल नागपूर इथं मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत पाच हजार १२७ कोटी रुपयांच्या करारावर स्वाक्षऱ्या झाल्या. गुंतवणुकीची ही रक्कम ३ हजार कोटींनी वाढवून आठ हजार कोटी करण्यात येईल, अशी घोषणा या कंपनीने केली.

दरम्यान, मुख्यमंत्र्यांच्या हस्ते काल X S I O इंडस्ट्रीयल एँड लॉजिस्टीक पार्कचं भूमिपूजन करण्यात आलं. ७०० कोटी रुपये गुंतवणूकीतून समृद्धी महामार्गालगतच जागतिक दर्जाचं हे पार्क उभारण्यात आलं आहे. दुसऱ्या टप्प्यात १०५ एकरावरील लॉजिस्टिक पार्कचं भूमिपूजनही काल झालं. यामुळे जवळपास १० हजार रोजगार निर्माण होतील, असं मुख्यमंत्री म्हणाले.

****

दरम्यान, मुख्यमंत्री आज छत्रपती संभाजीनगरच्या दौऱ्यावर आहेत. सिडको चौकात माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं तसंच हैदराबाद मुक्ती संग्रामाचे नेते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या क्रांती चौक परिसरातल्या अर्धपुतळ्याचं

अनावरण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाच्या वेळेत या रस्त्यांवरची वाहतुक पर्यायी मार्गाने वळवण्यात आली आहे. छत्रपती संभाजी नगर इथल्या भाजप कार्यालयाचं उद्घाटनही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आज होणार आहे

****

नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी इच्छूक उमेदवारांची नामनिर्देशनपत्रं ऑनलाईन तसचं ऑफलाईन पद्धतीनं आज रविवारीही स्वीकारली जाणार आहेत. आज सकाळी ११ ते दुपारी तीन या वेळेत नामनिर्देशनपत्रं स्वीकारण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगानं सर्व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना दिले आहेत. नामनिर्देशनपत्रं आणि शपथपत्रं दाखल करण्याची अंतिम मुदत १७ नोव्हेंबर म्हणजेच उद्या दुपारी तीन वाजेपर्यंत आहे. तरी अधिकाधिक इच्छुक उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रं आज दाखल केल्यास उद्या अखेरच्या दिवशी होणारी धावपळ टळू शकेल, असंही राज्य निवडणूक आयोगानं म्हटलं आहे

****

निवडणुकीत पराभव झाला म्हणून काँग्रेस संपेल ही टीका निरर्थक असून काँग्रेस पक्ष पुन्हा एकदा नव्या जोमानं आणि ताकदीनं उभा राहील असा विश्वास काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला यांनी व्यक्त केला. मुंबईत काल काँग्रेसचं एकदिवसीय शिबीर झालं त्यावेळी ते बोलत होते. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी यावेळी बोलतांना नकारात्मकता सोडून लढाऊ बाणा अंगी बाळगण्याचं आवाहन केलं.

****

अहिल्यानगर जिल्ह्यात राळेगणसिद्धी इथं प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नूतन इमारतीची राज्याचे सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी काल पाहणी केली. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पद्मभूषण अण्णा हजारे यांचीही आबीटकर यांनी भेट घेऊन संवाद साधला.

****

लोकशाहीर विठ्ठल उमप फाऊंडेशनचा ‘मृदगंध पुरस्कार’ गझलनवाझ भीमराव पांचाळे यांना जाहीर झाला आहे. २६ नोव्हेंबरला उमप यांच्या १५व्या स्मृतिदिनानिमित्त १५वा लोकशाहीर विठ्ठल उमप स्मृती संगीत समारंभ मुंबईत होणार आहे. या वेळी पांचाळे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. मानपत्र आणि मानचिन्ह असं या पुरस्काराचं स्वरूप आहे.

****

राज्य युवक महोत्सव 'इंद्रधनुष्य २०२५' नुकताच जळगाव इथल्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात पार पडला. त्यात ललित कला प्रकारातील माती कला स्पर्धेत नांदेडच्या वैभव विष्णू गिराम या विद्यार्थ्यांने तृतीय क्रमांक मिळवला.

****

बालरंगभूमी परिषदेच्या बीड शाखेच्या वतीनं जल्लोष लोककलेचा हा लोककला महोत्सव काल बीड इथं पार पडला. केएसके महाविद्यालयात झालेल्या या महोत्सवात जवळपास चारशे बालकलावंत आणि संघ सहभागी झाले.

****

छत्रपती संभाजीनगर इथं जिल्हाधिकारी कार्यालयात काल भगवान बिरसा मुंडा यांना अभिवादन करण्यात आलं. जिल्हाधिकारी दिलीप चव्हाण यांनी बिरसा मुंडा यांच्या कार्याला उजाळा देत, त्यांना आदरांजली वाहिली. छत्रपती संभाजीनगर महापालिकेतही काल बिरसा मुंडा यांना अभिवादन करण्यात आलं. लातूर जिल्हाधिकारी कार्यालयातही बिरसा मुंडा यांना आदरांजली वाहण्यात आली.

****

परभणी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथूर यांनी जलजीवन मिशन योजने अंतर्गत ग्रामीण भागातील पाणी पुरवठा योजनांची काल पाहणी केली. जिल्ह्यातील गावांमध्ये जल जीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा सुरळीतपणे होण्यासाठी संबंधित यंत्रणांना सूचना दिल्या. जिंतूर तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींना त्यांनी प्रत्यक्ष भेटी दिल्या.

****

कैरो इथं झालेल्या जागतिक नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय नेमबाज ईशा सिंगनं महिलांच्या २५ मीटर पिस्तुल प्रकारात कांस्यपदक जिंकलं. ईशाचं हे पहिलचं वैयक्तिक जागतिक पदक आहे.  तीन सुवर्ण, पाच रौप्य आणि चार कांस्यपदकांसह भारत पदकतालिकेत तिसऱ्या स्थानावर आहे. चीन १० सुवर्णांसह आघाडीवर तर कोरिया सहा सुवर्णांसह दुसऱ्या स्थानावर आहे.

****

भारत आणि दक्षिण अफ्रिका संघादरम्यान कोलकाता इथं सुरू असलेल्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्याचा कालचा दुसरा दिवस गोलंदाजांनी गाजवला. काल

दिवसभरात दोन्ही संघाच्या गोलंदाजांनी एकूण १६ बळी घेतले. भारताने आपला पहिला डाव एक बाद ३७ धावांवरून पुढे सुरू केला, आणि पहिल्या डावात नाममात्र ३० धावांची आघाडी घेत, १८९ धावांत यजमान संघ सर्वबाद झाला. के एल राहुलनं सर्वाधिक ३९ धावा केल्या तर अफ्रिकेचा गोलंदाज सायमन हार्मरनं चार गडी बाद केले. दुसऱ्या डावात पाहुण्या संघाचे सात फलंदाज ठराविक अंतराने बाद होत गेले. रविंद्र जडेजानं चार बळी घेतले. काल दिवसअखेर दक्षिण अफ्रिकेच्या सात बाद ९३ धावा झाल्या असून कर्णधार टेंबा बावुमा २९ धावांवर खेळत आहे.

****

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्याकडे त्यांनी काल राजीनामा सादर केला. आपली पुढील राजकीय भूमिका लवकरच जाहीर करणार असल्याचं योगेश क्षीरसागर यांनी सांगितलं आहे.

****

नांदेड जिल्ह्यातील उद्योजकांनी शासनाच्या मैत्री सहाय्य प्रणालीचा लाभ घ्यावा, असं आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल इंगळे यांनी केलं आहे. यासाठी नोंदणी, सहभाग तसंच लाभाच्या विविध सुविधेबाबत काही अडचण, असल्यास जिल्हा उद्योग केंद्राशी संपर्क साधण्याचं आवाहनही इंगळे यांनी केलं आहे.

****

दक्षिण मध्य रेल्वेतर्फे, नांदेड–तिरुचिरापल्ली–नांदेड ही विशेष रेल्वेगाडी सुरु करण्यात आली आहे. एकूण २२ डब्यांची ही रेल्वे, नांदेड इथून दर मंगळवारी दुपारी तर तिरुचिरापल्ली इथून दर बुधवारी रात्री सुटणार आहे.

****

राज्यात काल जळगाव इथं सर्वात कमी आठ पूर्णांक सात अंश तर अहलियानगर इथं सुमारे साडे नऊ अंश तापमान नोंदवलं गेलं. मराठवाड्यात बीड इथं साडे दहा अंश, परभणी इथं ११ पूर्णांक सात अंश तर छत्रपती संभाजीनगर इथं १२ पूर्णांक सहा अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याला आज आणि उद्या तर जालना तसंच बीडला उद्या थंडीचा यलो अलर्ट देण्यात आला आहे.

****